फुलशेती

# सूर्यफुलातील रोगांचा बंदोबस्त



**प्रा. रुपेशकुमार चौधरी**
(मो. ९४०३२४१६८४)
**प्रा. श्रीकांत सरदारे**
**प्रा. अंकित खेडीकर**
केवलरामजी हरडे कृषी महाविद्यालय,
चामोर्शी, जि. गडचिरोली



तेलबिया पिकांमध्ये सूर्यफूल हे एक महत्त्वाचे पीक आहे. सूर्यफुलाच्या तेलात ९० टक्के मोनोअनसॅच्युरेटेड व पॉलिअनसॅच्युरेटेड ॲसिड असल्यामुळे रक्तातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी करण्यास मदत होते. त्यामुळे हृदयविकाराच्या रुग्णांसाठी हे तेल अत्यंत महत्त्वाचे आहे. सूर्यफुलाच्या उत्पादन वाढीसाठी पिकांवर येणाऱ्या कीड व रोगांचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

भारतामध्ये घेण्यात येणाऱ्या तेलबिया पिकांमध्ये सूर्यफूल हे एक महत्त्वाचे पीक आहे. सूर्यफुलाच्या तेलात ९० टक्के मोनोअनसॅच्युरेटेड व पॉलिअनसॅच्युरेटेड ॲसिड असल्यामुळे रक्तातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी करण्यास मदत होते. त्यामुळे हृदयविकाराच्या रुग्णांसाठी हे तेल अत्यंत महत्त्वाचे आहे. सूर्यफुलाच्या उत्पादन वाढीसाठी पिकांवर येणाऱ्या कीड व रोगांचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. सूर्यफुलावरील येणारे महत्त्वाचे रोग खालीलप्रमाणे आहेत.

१) **करपा रोग**

हा एक बुरशीजन्य रोग आहे. हा रोग अल्टरनेरिया आहे. तो लियान्ति नावाच्या बुरशीमुळे होतो. या बुरशीची बीजुके रोगात बियाण्यावर व पिकाच्या अवशेषांवर जमिनीत आढळून येतात आणि तेथून ती संक्रमित होतात. रोगाचा दुय्यम प्रसार हवेद्वारे होतो. ढगाळ वातावरण, अधूनमधून पाऊस, कमी तापमान व जास्तीची आर्द्रता यामुळे हा रोग बळावतो. रोगाची सुरुवातीची लक्षणे म्हणजे जमिनीलगतच पानांवर पेरणीनंतर सुमारे ३०-४० दिवसांनी लहान वर्तुळाकार तांबूस ठिपके दिसून येतात. पुढे हे एकत्र मिसळून काळसर चट्ट्याच्या स्वरुपात पानावर दिसून येतात. पोषक वातावरणात हा रोग रोपांच्या खोडावर, पानांवर व सूर्यफुलाच्या पाठीमागील भागावर देखील चट्टे स्वरुपात आढळून येतो. यामुळे रोगग्रस्त पाने जळून जातात व रोपांच्या अन्न तयार करण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊन उत्पादनात घट येते.



२) **केवडा रोग**

हा बुरशीजन्य रोग असून हा प्लेसमोपरा हेलिस्टिडी या बुरशीमुळे होतो. रोगाची बीजुके बियाण्यांद्वारे व जमिनीत असणाऱ्या सुप्त बीजुकांद्वारे प्रसारित होतात. या रोगाची प्रमुख लक्षणे म्हणजे रोपांची उंची वाढत नाही. झाड खुजट होते. रोगग्रस्त झाडांची पाने पिवळसर पडतात. आर्द्रता जास्त असल्यास पानांच्या पाठीमागे पांढऱ्या बुरशीची वाढ दिसून येते. रोगग्रस्त झाडांची फुले बाजूला न झुकता आकाशाकडे वाढलेली असतात. रोगग्रस्त झाडांच्या फुलांमध्ये बीजधारणा शक्यतो होत नाही व झाल्यास बी हलके व पोचट राहते, उत्पादनात घट होते.

३) **तांबेरा रोग**

हा हवेद्वारे पसरणारा बुरशीजन्य रोग आहे. रोगाची लागण मुख्यत्त्वे रब्बी हंगामात साधारणपणे पीक ७०-७५ दिवसांचे असताना होते. पानावर खालच्या बाजूस नारिंगी/ तपकिरी रंगाचे फोड येतात व कालांतराने ते काळपट किंवा गर्द करड्या रंगाचे होतात. रोगाची तीव्रता जास्त असल्यास पूर्ण पानावर दोन्ही बाजूस ठिपके विखुरलेले असतात. रोगामुळे पाने करपतात, गळून पडतात व बी भरत नाही .

४) **शेंडेमर किंवा नेक्रोसिसरोग**

हा विषाणूजन्य रोग आहे व सूर्यफुलावरील सर्व पानांवर हा रोग दिसून येतो व टोबॅकोस्ट्रॅक नावाच्या विषाणूमुळे होणारा रोग आहे. हा रोग प्रामुख्याने फुलकिड्यांमार्फत प्रसारित होतो. या रोगाची प्रमुख लक्षणे म्हणजे रोप अवस्थेत झाडांचा शेंड्याजवळील पानावर काळपट व गोलाकार असे असंख्य ठिपके दिसून येतात. पाने वक्राकार होतात. पुढे रोपांच्या वाढणाऱ्या शेंड्याचा भाग व सभोवतालची पाने पिवळी पडून जळून जातात. यामुळे झाडांची वाढ खुंटते व झाड खुजे राहते. रोगग्रस्त झाडाच्या शेंड्याजवळ एक विशिष्ट प्रकारचा वाक तयार होतो. रोगात झाडांची बीजधारणा फारच कमी प्रमाणात होते.

वरील महत्त्वाच्या चारही रोगांच्या नियंत्रणासाठी खालील उपाययोजना केल्यास या रोगाचे व्यवस्थापन चांगल्या रितीने करता येईल. यासाठी खबरदारी म्हणून शेतामधील काडीकचरा वेचून काढावा व बांधावरचे तण नष्ट करून बांध स्वच्छ ठेवावा.

१) **करपा** रोगाच्या नियंत्रणासाठी पेरणीपूर्वी ३ ग्रॅम थायरम किंवा २ ग्रॅम कार्बेंडेझिम अधिक १ ग्रॅम कार्बेंडेझिम प्रतिकिलो बियाण्यास चोळून बीजप्रक्रिया करावी. पिकावरच्या रोग नियंत्रणासाठी मँकोझेब (डाइथेनएम -४५) २५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

२) **केवडा** रोग नियंत्रणासाठी ॲप्रॉन (मेटॅलॅकझिल) हे बुरशीनाशक (३ मि.लि./ किलोग्रॅम).

३) **तांबेरा** रोगनिवारण करण्याकरिता शक्यतो संकरित वाणांची पेरणी करावी तसेच मँकोझेब किंवा झायनेब (०.१ - ०.३ प्रवाही) यांची फवारणी करावी.

४) **नेक्रोसिस/ शेंडे मर** रोगाच्या प्रतिबंधासाठी रोगप्रसारक किडींच्या नियंत्रणासाठी पेरणीपूर्वी इमिडाक्लोप्रिड ७० डब्लू.एस. ५ ग्रॅम प्रतिकिलो बियाण्यास चोळून बीजप्रक्रिया करावी. ■